जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
१२.१०.२०२६
वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: ३७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

# शांततेत आंदोलन करणाऱ्यांना हात लावू नका

## ताब्यात घ्यायचं नाही, सुप्रीम कोर्टाचा दिल्ली पोलिसांना झटका

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – सुप्रीम कोर्टात अवमान याचिका आणि सीजेपी आंदोलनासंदर्भात चार याचिकांवर सुनावणी संपन्न झाली आहे. सुप्रीम कोर्टातील विशेष सुनावणी न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती वी. मोहाना यांच्या खंडपीठासमोर पार पडली. सुप्रीम कोर्टानं शांततेनं जे जमले आहेत त्यांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊ नये, असे आदेश दिले आहेत. कायद्याद्वारे निश्चित करण्यात आलेल्या प्रक्रियेशिवाय एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेऊ नये. प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना त्या क्षेत्राबाहेर जमलेल्या शांततापूर्ण आणि निशस्त्र लोकांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊ नये, असं सुप्रीम कोर्टानं म्हटलं.

सुप्रीम कोर्टातील सुनावणीतील १० मुद्दे

न्या.जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती वी. मोहाना यांनी सुप्रीम कोर्टाबाहेर भारतीय न्याय संहितेचं कलम १६३ लागू करणारा आल्याचे फलक किंवा बोर्ड काढले नसले तर काढावेत, असे देखील आदेश दिले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत मेट्रो आणि रेल्वे सेवा नियमितपणे सुरु ठेवाव्यात असे आदेश देखील दिल्ली पोलिसांना देण्यात आले आहेत.

कोर्टानं लोकांना शहरामध्ये वाहतूक नियमनासह मुक्तपणे फिरता आलं पाहिजे. दिल्ली शहरात लावण्यात आलेल्या बॅरिकेडसच्या निर्णयाची समीक्षा करावी, असे देखील आदेश देण्यात आले आहेत.

सुप्रीम कोर्टानं नवी दिल्लीत इंटरनेट सेवा अखंडित राहावी, असा आदेश देखील दिला आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी १० ऑक्टोबरच्या रात्रीपासून इंटरनेट सुविधा सुरु असल्याचं म्हटलं.

सुप्रीम कोर्टातील विशेष सुनावणीमध्ये कपिल सिब्बल हे एका याचिकाकर्त्यामार्फत सुनावणीत सहभागी झाले होते. पोलिसांकडून अनेकांना रेल्वेतून आणि जंतर मंतरच्या ४ किलोमीटरच्या परिघाबाहेरुन ताब्यात घेण्यात आलं होत. त्यापैकी एका व्यक्तीतर्फे कपिल सिब्बल सुनावणीत सहभागी झाले होते. कपिल सिब्बल यांनी इंटरनेटचं बंद केल्याचा मुद्दा मांडला. ४५ मेट्रो स्टेशन न्यायालयाच्या आदेशानंतर देखील बंद होते, असं सिब्बल यांनी सांगितलं.

सुप्रीम कोर्टानं पोलीस अधिकाऱ्यांना बॅज शिवाय कारवाई करणे, गरजेपेक्षा अधिक बलप्रयोग करणे, बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे याची उत्तरं द्यावी लागतील असं म्हटलं.

# गेल्या ७२ तासांत 'हुकूमशाह' मोदींनी

## आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले

**सीजेपीच्या पुढील आंदोलनाबाबत आशुतोष रांका आणि सौरभदास पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली**




*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – 'देशात गेल्या ७२ तासांपासून १९७५ च्या आणीबाणी सारखी परिस्थीती निर्माण झाली असून 'हुकूमशाह' मोदींनी आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले आहे. सरकारचे मानसिक संतुलन पूर्णपणे बिघडले असून स्वतःच्याच नागरिकांविरुद्ध युद्ध पुकारत आहे,' असा हल्लाबोल सीजेपीने केला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीन (सीजेपी) फोडलेल्या डरकाळीने गेल्या दोन दिवसांपासून राजधानी दिल्ली अक्षरशः हादरली आहे. पोलिसांनी आंदोलक व त्यांच्या नेत्यांची धरपकड करीत शेकडो जणांना ताब्यात घेतले. 'सीजेपी'चे प्रमुख अभिजित दीपके व त्यांचे सहकारी सौरव दास, आशुतोष रांका यांना दिल्लीत दाखल होताच विमानातच ताब्यात घेतले होते. आज न्यायालयाने त्यांची काही अटींसह सुटका केली. त्यानंतर आशुतोष रांका आणि सौरभ दास यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारवर जहरी टीका केली.

गेल्या ७२ तासांत देशात अशा काही घटना घडल्या आहेत ज्यांची कोणीही कल्पना केली नसेल. सीजेपीचा लढा हा निवडणूक आयोग आणि ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आहे. देशाचे रक्षण आणि प्रगती करण्याची जबाबदारी असलेल्या या निवडणूक आयोगाने आपली भूमिकाच धोक्यात आणली आहे,' असा आरोप रांका यांनी केला.'७२ तासांत आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले'

दिल्लीत आंदोलकांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत बोलताना रांका म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी गेल्या ७२ तासांत आणीबाणीच्या काळातील घटनांनाही मागे टाकले आहे. पंतप्रधान मोदींचे वर्णन 'हुकूमशाह' असे करत त्यांनी निदर्शनांशी संबंधित पोलीस कारवाई व अटकेच्या घटनांवर टीका केली.

## थोडक्यात

### अजिंक्य शिंदेंच्या नेतृत्वात सीजेपीचे आंदोलक पुन्हा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – कॉकरोच जनता पार्टी आज (रविवारी, ता ११) दुसऱ्या दिवशी देखील दिल्लीच्या जंतरमंतर आंदोलन करण्यावर ठाम आहे. अभिजित दिपके यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर आता अजिंक्य शिंदे यांच्या नेतृत्वात आज कॉकरोच जनता पार्टी आंदोलन करणार आहे. जंतर-मंतरवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त आहे. तर ३७ स्पॉटवर पोलिसांनी बॉकेज पॉईंट उभारले आहेत. कॉकरोच जनता पार्टीने पुकारलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीतील राजकीय वातावरण तापले आहे. कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना फी माफीचा जीआर, तरीही विद्यार्थ्यांकडून सक्तीची फी वसुली?

## मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंकडून शाळांना थेट इशारा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – दुष्काळात सरकारने फीस माफीचा जीआर काढला आहे, त्यामुळे फी वसूल करून शाळानी खोडसाळपना करू नये, असा इशारा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिला आहे. दुष्काळात केंद्रीय पदकाकडूनही पाहणी झाली आहे. आता लवकरात लवकर मदत जाहीर केली जाईल. आज केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार आहे. नुकसान मोठ आहे, त्यामुळे पंचनामे नीट करून शेतकऱ्यांना योग्य मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याची माहिती देखील मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली आहे. ते धाराशिव येथे बोलत होते. राज्यातील दुष्काळी परिस्थिती घोषित केलेल्या भागातील कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे थांबू नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढाकार घेत दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांकडून शालेय शुल्क माफ करण्यात आले आहे. असे असताना काही शाळेंकडून सक्तीने फी वसूल केली जात असल्याचे समोर आलं आहे. परिणामी, दुष्काळात सरकारने फीस माफीचा जीआर काढला आहे, त्यामुळे फी वसूल करून शाळानी खोडसाळपना करू नये, असा इशारा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिला आहे. शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभं राहता यावं, राज्यातील परिस्थिती सुधारावी, याकरिता आईकडे साकडे घातलं असेही शिवेंद्रराजे यावेळी म्हणाले. यांच्यासोबत यावेळी भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील हे देखील उपस्थित होते. शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याची राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी दिली.

शालेय फीस बाबत सरकारने जीआर काढला. मात्र शाळा घेत असतील तर ती फी वसूल करू नये. अशा कडक सूचना शाळेंना देण्यात येईल. शासन निर्णय असताना त्याचं पालन व्हायलाच हवं, मात्र काही शाळांकडून हा खोडसाळपणा केला जात असेल तर त्यांच्या बद्दल माहिती घेऊ, असेही मंत्री शिवेंद्रराजे भोसले.

# सायन रुग्णालयात डॉक्टरने आयुष्य संपवलं, भूल देण्याच्या औषधाने भरलेली सलाईन घेऊन बाथरुममध्ये गेला अन परतलाच नाही

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**मुंबई** – मुंबईच्या सायन रुग्णालयातील निवासी डॉक्टरने शनिवारी संध्याकाळी वसतीगृहात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्या केलेल्या निवासी डॉक्टरचे नाव शिवचरण आप्पा पाटील असे आहे. शिवचरण पाटील याने ॲनस्थेशियाचा ओव्हरडोस घेऊन आयुष्य संपवल्याची प्राथमिक माहिती आहे. शनिवारी संध्याकाळी सायन रुग्णालयाच्या वसतीगृहातील त्याच्या रुममध्ये त्याचा मृतदेह सापडला. शिवचरण पाटील हा सर्जरी विभागात पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षात शिकत होता. या घटनेमुळे सायन रुग्णालयात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी शिवचरण पाटील रुग्णालयात नसल्याचे निदर्शनास आले. ते रुग्णालयाच्या पीजी वसतीगृहात राहतात. ते वॉर्डमध्ये कामाला आले नव्हते. त्यामुळे त्यांच्या रुम पार्टनरला शिवचरण पाटील खोलीत आहेत का, हे पाहून या, असे सांगण्यात आले. त्यानुसार शिवचरण पाटील यांचा सहकारी खोलीत गेला. तेव्हा शिवचरण खोलीत दिसला नाही. त्याला फोन केला तेव्हा त्याच्या मोबाईलचा आवाज बाथरूममधून आला.

# मित्रांसोबत दुपारच्या रणरणत्या उन्हात राजगड पाहायला गेला अन आक्रित घडलं, चक्कर येऊन बेशुद्ध पडला, तरुणाचा दुर्देवी अंत

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**पुणे** – राजगड किल्ला चढताना ३५ वर्षीय पर्यटकाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक राजगड किल्ल्यावर पर्यटनासाठी आलेल्या युवकाचा मृत्यू झाला. काल रोजी दुपारी दोनच्या सुमारास घटना घडली आहे. जिज्ञेश सदाशिव खंडाळकर असे मृत पर्यटकाचं नाव आहे. मूळचे छत्रपती संभाजीनगरचे रहिवासी, सध्या पुण्यातील हडपसरच्या भेकराईनगरमध्ये वास्तव्यास होते. पुण्यातून तीन युवक आले होते राजगड किल्ला पाहण्यासाठी गेले होते. पाल बुद्रुक मार्गाने किल्ला चढताना जिज्ञेश यांना अचानक चक्कर येऊन ते बेशुद्ध पडले. हृदयविकाराचा झटका आल्याचा प्राथमिक अंदाज आहे; पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी मदतीसाठी धाव घेतली. तर मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथून तिघेजण किल्ले राजगड पाहण्यासाठी आले होते.



# सोमेश्वर साखर कारखाना निवडणुकीसाठी सुनेत्रा पवारांनी बजावला मतदानाचा हक्क

## बारामतीत राजकीय वातावरण तापलं, सभासदांच्या कौलाकडे लक्ष

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**बारामती** – सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी विरुद्ध पुरुषोत्तम जगताप यांनी भाजपच्या सहाय्याने पॅनल उभा केला आहे. सुनेत्रा पवारांची राष्ट्रवादी आणि पुरुषोत्तम जगताप यांच्या पॅनल मोठ्या प्रमाणात पैसे वाटल्याचा आरोप शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष आणि स्वतः उमेदवार असलेले राजेंद्र जगताप यांनी केलेला आहे. असे जरी असलं तरी आमचा



विजय निश्चित आहे असा विश्वास राजेंद्र जगताप यांनी व्यक्त केलाय. तर सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मतदानाचा हक्क बजावला. श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत असून, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. संचालक पदाच्या २१ जागांसाठी आज मतदान होणार असून ९३ मतदान केंद्रांवरती मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. एकूण २७,६२५ इतके मतदार असून या निवडणुकीत राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार गट विरुद्ध राष्ट्रवादीतून बंडखोरी करत भाजपच्या सहाय्याने पॅनल उभा केलेले पुरुषोत्तम जगताप निवडणुकीच्या आखाड्यात आहेत.

# 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती आणि जनसंपर्क विभागाची निर्मिती असलेल्या 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली




समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरून प्रसारण करण्यात आले आहे.

संतपरंपरा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचवण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# एसआयआर विरोधातील आंदोलनाने पुण्यात तणाव

## ८८ आंदोलक पोलिसांच्या ताब्यात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेला आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेला विरोध करण्यासाठी पुण्यात शनिवारी आंदोलन करण्यात आले. लाल महाल चौक आणि शनिवारवाडा परिसरात जमलेल्या सीजेपीच्या ८८ आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. ताब्यात घेतलेल्या आंदोलकांना लष्कर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तेथे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू




केले, तर पोलीस ठाण्याबाहेर समर्थकांनी घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

पोलिसांच्या माहितीनुसार, एसआयआर प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात शनिवारवाडा ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढण्यासाठी काही संघटनांनी परवानगी मागितली होती. मात्र, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी परवानगी नाकारली होती. तरीही शनिवारी दुपारी काही आंदोलक शनिवारवाडा परिसरात रस्त्यावर जमले. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याचे सांगत पोलिसांनी ८८ आंदोलकांना ताब्यात घेतले.

या कारवाईची माहिती मिळताच आंदोलकांचे समर्थक पोलीस ठाण्याबाहेर जमा झाले. दरम्यान, ताब्यात घेतलेल्या काही युवकांचे पालकही पोलीस ठाण्यात दाखल झाले. संबंधित युवकांना पालकांच्या स्वाधीन करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## गोळा फेक स्पर्धेत जनता गर्ल्स हायस्कूलची

# आस्था विटाळकर हिची विभागीय स्तरावर झेप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदूरजनाघाट** – अमरावती येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय गोळा फेक स्पर्धेत जनता गर्ल्स हायस्कूल येथील विद्यार्थिनींनी आस्था मनिष विटाळकर हिने उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.




तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून तिच्या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशासाठी क्रीडा शिक्षक अमोल काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले असुन विद्यार्थिनीच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका माया हिवसे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच व्यवस्थापन मंडळाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आस्थाच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# एमपीएससी आंदोलन तीव्रतेच्या वाटेवर : अध्यक्षांच्या हकालपट्टीच्या मागणीवर ठाम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारातील कथित गैरप्रकारांच्या निषेधार्थ पुण्यात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उच्च न्यायालयाच्या निरीक्षणानंतरही विद्यार्थी आपल्या मागण्यांवर ठाम असून, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या हकालपट्टीची मागणी करत आहेत. उच्च न्यायालयाने पुण्यातील नागरिकांची गैरसोय




टाळण्यासाठी आंदोलन मागे घेऊन अभ्यासाकडे लक्ष द्यावे, असे निरीक्षण नोंदविल्याचे वृत्त आहे. मात्र, आंदोलनकर्त्यांनी माघार घेण्यास नकार दिला आहे. नांदेड, जालना, नागपूर, अहिल्यानगर यांसह विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे सांगण्यात आले.

आमदार रोहित पवार यांनी आंदोलनासाठी २ ऑक्टोबर रोजी परवानगी देण्यात आल्याचा दावा करत, विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्यास तो सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना आपल्यावर हटविण्याऐवजी कारवाई करावी, असे आव्हानही त्यांनी पोलिसांना दिले.

ग्रामीण आणि गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करताना मोठा आर्थिक संघर्ष करावा लागतो. परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांमुळे अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे पवार म्हणाले. आंदोलनाविरोधात न्यायालयात गेलेल्या याचिकाकर्त्यांचे राजकीय संबंध आणि पोलीस अधिकाऱ्यांशी झालेल्या भेटींची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. त्यामुळे आंदोलनाबाबत सरकार आणि पोलीस प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

शिवराज मोरे यांच्यासह पाच जणांवर गुन्हा पुण्यातील नवी पेठ येथील एस. एम. जोशी पुलाजवळ सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान विनापरवाना ड्रोन उडवून चित्रीकरण केल्याप्रकरणी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्यासह पाच जणांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुमारे ५० हजार रुपये किमतीचे ड्रोन आणि रिमोट कंट्रोलर जप्त केले आहेत. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास आंदोलकांच्या गर्दीवर ड्रोन उडविले जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

## खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नामुळे

# हजारो एकर शेती येणार ओलिताखाली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – पुसला येथील पंढरी मध्यम प्रकल्पावरील, भवानी माता पाणी वापर संस्थेच्या सर्व शेतकरी बांधवांसोबत राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे मार्गदर्शनात इंद्रभूषण सोंडे यांच्या नेतृत्व भेट घेतली. या दुष्काळी परिस्थितीमध्ये संत्रा बागा वाचविण्यासाठी ओलितासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी सुचना खासदार डॉ.बोंडे यांनी अधिकाऱ्यांना केली.

यावर्षी पावसाळा कमी झाल्याने विहिरीला फक्त १० ते १५ मिनिटांचे पाणी आहे. संत्रा झाडांवर लोहादरा, उराड, पुसला या भागातील संत्रा बागेमध्ये मोठ्या प्रमाणात आंबिया बहार तथा मृग बहाराचे फळांची फळधारणा झाली आहे.




सोबतच मिरची कापूस व तूर असे पिक पाण्याअभावी वाळत आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू येण्याची पाळी आली आहे. अशा स्थितीत संत्रा बागा कशा वाचवायच्या? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला होता. भवानी माता पाणी वापर संस्थेच्या सर्व सभासदांनी इंद्रभूषण सोंडे यांच्या नेतृत्वात खासदार डॉ.अनिल बोंडे यांना शेतकऱ्यांना ओलितासाठी पाणी मिळवुन देण्यासंदर्भामध्ये मागणी केली. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेता डॉ.बोंडे यांनी तातडीने अमरावती येथे बैठक लावली. या बैठकीला अधीक्षक अभियंता राजभोग, राऊत, उपविभागीय अधिकारी पालवे, पांडे, पोहरे, महाले आणि लिपिक बेलसरे व संस्थेचे अध्यक्ष अभिजीत अहेर, सचिव संदीप बागडे, पदाधिकारी मोठ्या प्रमाणामध्ये शेतकरी बांधव उपस्थित होते .

खासदार डॉ.बोंडे यांनी तातडीने पाणी देण्यासंदर्भामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. राजभोग यांनी पाणी देण्यासंदर्भात आश्वस्त केले.

यामुळे शेतकऱ्यांना ओलितासाठी पाणी मिळणार आहे. हजारो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. त्यांच्या संत्रा बागा वाचणार आहे, यासाठी सर्व शेतकऱ्यांनी अधिकारी व खासदार डॉ.बोंडे यांचे आभार मानले.

## एनटीआर हायस्कूलमध्ये १० वी च्या पालक सभेला पालकांचा उदंड प्रतिसाद

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी दिग्गजांचे मार्गदर्शन!

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्थानिक एन.टी.आर.हायस्कूल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची विशेष पालक सभा अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश बरडिया होते तर प्रमुख अतिथी म्हणुन लीलाधर लांडगे, शिल्पा शेवतकर आणि निर्मळ व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मुख्याध्यापक योगेश बरडिया यांनी




'दहावी हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे वळण असून शाळा आणि पालकांनी संयुक्तपणे प्रयत्न केल्यास विद्यार्थी नक्कीच उत्तुंग यश मिळवतील,' असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी प्रमुख अतिथी शिल्पा शेवतकर व निर्मयळ यांनी सुध्दा मार्गदर्शन केले. याप्रसंगी वर्गशिक्षक प्रदीप मेश्राम, वर्गशिक्षिका प्रगती फुटाणे आणि कोमल वांगे यांनी पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती, उपस्थिती आणि आगामी बोर्ड परीक्षेच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर झालेल्या 'पालक-शिक्षक संवादात' पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रदीप मेश्राम तर उपस्थितांचे आभार कोमल वांगे यांनी मानले. सभेला सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

**जिवाभावाचा मित्र ही देवाची सर्वात भारी भेट आहे.**

## भारत सरकार : विकास, लोककल्याण आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने

लोकशाहीची ताकद, जनतेच्या अपेक्षा आणि विकसित भारताचे स्वप्न भारत हा जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशांपैकी एक आहे. विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरांनी नटलेल्या या देशाला एकत्र बांधून ठेवण्याचे कार्य भारतीय संविधान आणि लोकशाही व्यवस्था करतात. देशाचा कारभार चालविणे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे, आर्थिक विकासाला गती देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना संधी उपलब्ध करून देणे ही भारत सरकारची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. सरकार कोणतेही असो, त्याच्या कामगिरीचे खरे मूल्यमापन जनतेच्या जीवनात झालेल्या बदलांवरूनच व्हायला हवे.

**लोकशाही व्यवस्थेचा आधार**

भारत सरकारची रचना संसदीय लोकशाहीवर आधारित आहे. राष्ट्रपती हे देशाचे घटनात्मक प्रमुख असून पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्रिपरिषद प्रशासन चालवते. संसद कायदे करते, कार्यकारी यंत्रणा त्यांची अंमलबजावणी करते आणि न्यायव्यवस्था संविधान व कायद्यांचे संरक्षण करते. या संस्थांमधील संतुलन हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

लोकशाहीत निवडणुका महत्त्वाच्या असल्या, तरी लोकशाहीचे कार्य केवळ मतदानापुरते मर्यादित नसते. जनतेला प्रश्न विचारण्याचा अधिकार, प्रसारमाध्यमांची भूमिका, विरोधी पक्षांचे उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सार्वजनिक चर्चेतील सहभाग यांमुळे शासन अधिक जबाबदार बनते. त्यामुळे सरकारच्या निर्णयांचे समर्थन किंवा विरोध करण्यापेक्षा त्या निर्णयांचा देशातील नागरिकांवर नेमका काय परिणाम होतो, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे.

**विकासाच्या दिशेने वाटचाल**

स्वातंत्र्यानंतर भारताने उद्योग, शेती, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रांत विविध टप्प्यांवर प्रगती केली आहे. महामार्ग, रेल्वे, डिजिटल सेवा, बँकिंग सुविधा आणि दळणवळणाच्या विस्तारामुळे देशाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये बदल घडले आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे अनेक शासकीय सेवा नागरिकांपर्यंत ऑनलाइन पोहोचविण्याचा प्रयत्न झाला आहे.

मात्र, विकासाचा अर्थ केवळ मोठे प्रकल्प उभारणे किंवा आर्थिक आकडेवारीत वाढ होणे एवढाच नाही. सामान्य नागरिकाला चांगले शिक्षण मिळते का, रुग्णालयात उपचार उपलब्ध होतात का, तरुणांना रोजगार मिळतो का आणि शेतकऱ्याला उत्पादनातून योग्य उत्पन्न मिळते का, या प्रश्नांची उत्तरेही विकासाचे वास्तव स्पष्ट करतात. देशाच्या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शहरांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध होत असताना ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांमध्येही सुधारणा झाली पाहिजे.




# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा दिलासा मिळणार?

### कापूस, सोयाबीन, तूर पिकांची प्रत्यक्ष पाहणी; पीक परिस्थितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर होणार

**दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेऊन त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. कापूस, सोयाबीन आणि तूर या प्रमुख पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक परिस्थितीचे मूल्यांकन करण्यात आले. शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचे सांगण्यात आले असून, पीक परिस्थितीचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. मात्र, ही आशा प्रत्यक्ष मदतीत कधी परिवर्तित होणार, हा प्रश्न अद्याप महत्त्वाचा आहे**

दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कापूस, सोयाबीन आणि तूर या प्रमुख पिकांच्या नुकसानीचे मूल्यांकन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असून, पाहणीचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला जाणार आहे. त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

**निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी संकटात**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे हाच कणा वारंवार संकटात सापडत आहे. पावसाचे अनियमित प्रमाण, पावसातील खंड आणि पिकांना आवश्यक असलेल्या ओलाव्याचा अभाव यांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होत आहे. पेरणीपासून पीक काढणीपर्यंत शेतकरी मोठ्या अपेक्षेने कष्ट घेत असतो. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीसाठी मोठा खर्च करूनही निसर्गाची साथ मिळाली नाही, तर संपूर्ण हंगामाचे नियोजन कोलमडून पडते.

दुष्काळी परिस्थितीचा सर्वाधिक फटका कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना बसतो. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटते, फुलोरा आणि शेंगा लागण्याच्या अवस्थेत पिकांना पुरेसा ओलावा मिळत नाही. परिणामी उत्पादनात घट होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना केवळ आर्थिक नुकसान सहन करावे लागत नाही, तर पुढील हंगामासाठी भांडवल उभे करण्याचे आव्हानही त्यांच्यासमोर उभे राहते.

**कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची पाहणी**

दुष्काळी परिस्थितीची तीव्रता समजून घेण्यासाठी कापूस, सोयाबीन आणि तूर या पिकांची प्रत्यक्ष पाहणी व मूल्यांकन करण्यात आले. शेतातील पिकांची सद्यस्थिती, पावसाचा परिणाम आणि संभाव्य उत्पादनातील घट यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थिती जाणून घेतल्यामुळे कागदोपत्री आकडेवारीपलीकडील वास्तव समोर येण्यास मदत होते.

विदर्भातील अनेक शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मोठा आधार असलेल्या कापूस आणि सोयाबीन पिकांवर प्रतिकूल हवामानाचा परिणाम झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचे पडसाद उमटतात. तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठीही पिकांची वाढ, फुलधारणा आणि शेंगांची स्थिती महत्त्वाची असते. त्यामुळे या पिकांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून नुकसानीची व्याप्ती निश्चित करणे गरजेचे आहे.

**शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून दिला धीर**

दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आकडेवारीतून समजू शकत नाहीत. पीक उत्पादनातील घट, वाढता उत्पादन खर्च, शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह यांसारख्या प्रश्नांमुळे शेतकरी मानसिक व आर्थिक तणावातून जात असतो. अशा वेळी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि




त्यांना धीर देणे महत्त्वाचे ठरते.

शेतकऱ्यांना संकटाच्या काळात शासन आपल्या पाठीशी उभे असल्याची खात्री मिळणे आवश्यक आहे. मात्र, केवळ आश्वासनांवर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेऊन मदतीचे निकष निश्चित करणे, पंचनामे वेळेत पूर्ण करणे आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवणे ही पुढील टप्प्यातील महत्त्वाची कामे आहेत.

**केंद्र सरकारच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे लक्ष**

दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचे सांगण्यात आले आहे. पीक परिस्थितीचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात येणार असून, त्यामध्ये प्रत्यक्ष पाहणीतील निरीक्षणे आणि पिकांच्या स्थितीचे मूल्यांकन महत्त्वाचे ठरणार आहे.

या अहवालाच्या आधारे पुढील निर्णय होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आता शासनाच्या मदतीकडे लागले आहे. तथापि, मदतीची नेमकी रक्कम, पात्रता, निकष आणि वितरणाचे वेळापत्रक याबाबत अधिकृत निर्णय होणे आवश्यक आहे. संकटाच्या काळात मदत वेळेत मिळणे हे मदतीच्या घोषणेइतकेच महत्त्वाचे आहे.

**अहवालानंतर ठोस निर्णयाची अपेक्षा**

पीक परिस्थितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर करणे हा मदतीच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. मात्र, या प्रक्रियेला गती देऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे अधिक गरजेचे आहे. नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे सर्वेक्षण, वस्तुनिष्ठ पंचनामे, नुकसानभरपाईचे निकष आणि मदतीचे वेळेत वितरण यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना केवळ तात्पुरत्या आर्थिक मदतीचीच नव्हे, तर भविष्यातील शेती सुरक्षित करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचीही गरज आहे. जलसंधारण, शेततळी, सिंचन सुविधांचा विस्तार, पीक विम्याची प्रभावी अंमलबजावणी आणि हवामानाच्या बदलत्या परिस्थितीनुसार पीक नियोजन यांवर भर दिल्यास शेतकऱ्यांची संकटाशी सामना करण्याची क्षमता वाढू शकते.

शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि पीक परिस्थितीचे मूल्यांकन करणे हा दिलासादायक प्रयत्न आहे. आता या पाहणीचे रूपांतर ठोस निर्णयात आणि प्रत्यक्ष मदतीत होणे आवश्यक आहे. कारण शेतकऱ्यांसाठी प्रत्येक दिवस महत्त्वाचा आहे. शासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली, तरच दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ग्रामीण भागाला खऱ्या अर्थाने दिलासा मिळू शकेल.

**निसर्गाच्या लहरीपणाचा शेतीला मोठा फटका**

शेती हा केवळ व्यवसाय नसून ग्रामीण भागातील लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार आहे. शेतकरी वर्षभर शेतात राबतो, पिकांच्या वाढीसाठी मेहनत घेतो आणि हंगामाच्या अखेरीस चांगले उत्पादन मिळेल, या अपेक्षेने दिवस काढतो. मात्र, पावसाच्या अनिश्चिततेमुळे त्याच्या या अपेक्षांवर पाणी फिरण्याची वेळ वारंवार येते. पावसाचे प्रमाण कमी राहणे, पावसात दीर्घ खंड पडणे आणि जमिनीतील ओलावा कमी होणे यामुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो.

दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्यांसमोर केवळ पिके वाचविण्याचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचा आर्थिक गाडा चालविण्याचे आव्हान उभे राहते. पेरणीपूर्वी केलेला खर्च, बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि शेतीच्या मशागतीसाठी घेतलेले कर्ज यांची परतफेड करण्याची चिंता त्याला सतावत असते. उत्पादन घटल्यास उत्पन्न कमी होते; परंतु उत्पादनासाठी केलेला खर्च मात्र कमी होत नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी अधिक गंभीर बनतात.

**कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींकडे लक्ष देण्याची गरज**

विदर्भातील शेती व्यवस्थेत कापूस पिकाला महत्त्वाचे स्थान आहे. अनेक शेतकरी आपल्या आर्थिक नियोजनाचा मोठा भाग कापूस पिकावर अवलंबून ठेवतात. मात्र, पावसातील खंड आणि जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास कापसाच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. झाडांची वाढ खुंटणे, बोंडांची संख्या कमी होणे आणि उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण होते.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळणे हेदेखील मोठे आव्हान आहे. एकीकडे नैसर्गिक संकट, तर दुसरीकडे बाजारातील अनिश्चितता, अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडतो. त्यामुळे पीक नुकसानीचे मूल्यांकन करताना केवळ पिकांची वरवरची स्थिती न पाहता संभाव्य उत्पादन घट आणि शेतकऱ्यांवर होणारा आर्थिक परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे.

**सोयाबीन उत्पादकांची आर्थिक कोंडी**

सोयाबीन हे विदर्भातील अनेक शेतकऱ्यांचे प्रमुख पीक आहे. कमी कालावधीत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा ठेवून शेतकरी सोयाबीनची लागवड करतात. मात्र, पावसाचे असमान वितरण, दीर्घ कोरडा कालावधी आणि प्रतिकूल हवामान यामुळे सोयाबीनच्या उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. पिकाच्या महत्त्वाच्या वाढीच्या टप्प्यावर पाण्याची कमतरता भासल्यास उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण या दोन्हींवर परिणाम होण्याची शक्यता असते.

सोयाबीनच्या उत्पादनात घट झाली तर शेतकऱ्यांचे पुढील आर्थिक नियोजन विस्कळीत होते. शेतीच्या खर्चासाठी घेतलेले कर्ज फेडणे, घरातील दैनंदिन खर्च भागविणे, मुलांचे शिक्षण आणि पुढील हंगामाची तयारी करणे या जबाबदाऱ्या त्याच्यासमोर कायम असतात. त्यामुळे नुकसानग्रस्त सोयाबीन उत्पादकांना मदत देताना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेणे गरजेचे आहे.

**तूर उत्पादक शेतकऱ्यांनाही दिलासा हवा**

तूर हे महत्त्वाचे कडधान्य पीक असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात त्याचा वाटा असतो. तुरीच्या पिकाला योग्य वेळी आवश्यक पाणी आणि अनुकूल हवामान मिळणे महत्त्वाचे आहे. दुष्काळी परिस्थितीत पिकाची वाढ, फुलधारणा आणि शेंगा भरण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. परिणामी अपेक्षित उत्पादन मिळण्याबाबत अनिश्चितता वाढते.

तूर पिकाच्या नुकसानीचे मूल्यांकन करताना शेतातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. पिकांची वाढ, उपलब्ध ओलावा, पावसाचे प्रमाण आणि संभाव्य उत्पादन यांचा आढावा घेतल्यास नुकसान निश्चित करण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे कापूस आणि सोयाबीनप्रमाणेच तूर उत्पादकांच्या समस्यांकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**प्रत्यक्ष पाहणीमुळे वास्तव समोर येण्यास मदत**

दुष्काळी परिस्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. कार्यालयात बसून तयार केलेल्या अहवालातून काही बाबी समजू शकतात; परंतु प्रत्यक्ष शेतात गेल्यानंतर पिकांची अवस्था, जमिनीतील ओलावा आणि शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक स्पष्ट होतात. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवांची माहिती घेतल्यास परिस्थितीचे अधिक वास्तववादी चित्र समोर येऊ शकते.

पीक परिस्थितीच्या पाहणीचा उद्देश केवळ नुकसानीची नोंद करणे नसून शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारच्या मदतीची आवश्यकता आहे, हे समजून घेणेही असले पाहिजे. नुकसानग्रस्त क्षेत्र निश्चित करणे, पीकनिहाय परिस्थितीचा आढावा घेणे आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी आवश्यक माहिती संकलित करणे या बाबींना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

**केंद्र सरकारच्या मदतीबाबत सकारात्मक संकेत**

दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचे सांगण्यात आले आहे. पीक परिस्थितीचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार असल्याने पुढील निर्णय प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे. या अहवालामध्ये प्रत्यक्ष पाहणीतील निरीक्षणे आणि पिकांच्या नुकसानीची माहिती महत्त्वाची ठरणार आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणे ही काळाची गरज आहे. मात्र, मदतीबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त होणे आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे अहवाल सादर झाल्यानंतर त्यावर किती लवकर निर्णय घेतला जातो, मदतीचे निकष काय असतात आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत मदत कधी पोहोचते, याकडे लक्ष लागले आहे.

दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारमधील समन्वय महत्त्वाचा आहे. नुकसानग्रस्त भागाची अचूक माहिती, वेळेत पूर्ण होणारे पंचनामे आणि पारदर्शक मदतवाटप यामुळे मदतीचा लाभ योग्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होऊ शकते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी पिंगळादेवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली!

## दिवसातून तीन वेळा रूप बदलणारी पिंगळाई गडावरील पिंगळादेवी

## ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मोर्शी** – विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पिंगळाई गडावरील पिंगळादेवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. रविवार, ११ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवानिमित्त देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान विश्वस्त मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अमरावती-मोर्शी मार्गावरील गोराळा बसस्थानकापासून पूर्वेला सुमारे एक किलोमीटर अंतरावर निसर्गाच्या सान्निध्यात टेकडीवर पिंगळादेवीचे ऐतिहासिक मंदिर आहे. पूर्वाभिमुख मोहक चेहरा, तेजस्वी डोळे, उंच कपाळ आणि कपाळावर चंद्रकोर व कुंकू असलेली देवीची मूर्ती भाविकांचे श्रद्धास्थान आहे. पिंगळादेवी दिवसातून तीन वेळा रूप बदलते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. सकाळी बालरूप, दुपारी तरुण रूप आणि सायंकाळी वृद्ध रूप देवीमध्ये दिसते, अशी आख्यायिका सांगितली जाते. देवीच्या मूर्तीचे धड जमिनीच्या आत असून केवळ शिर वर दिसते, असेही सांगितले जाते.



मंदिराची बांधणी हेमाडपंथी शैलीतील असून मंदिरासमोर दीपस्तंभ आहे. शारदीय व चैत्र नवरात्रोत्सव येथे मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. तसेच पौष महिन्यात चंडिका महायज्ञ उत्सवाचे आयोजन करण्यात येते. नवरात्रोत्सवातील अश्विन शुद्ध अष्टमीला मध्यरात्री बारा वाजता मंदिरापासून जवळच असलेल्या कापूर तलावापर्यंत खापरी काढण्याची परंपरा आहे. मातीच्या मडक्यात धगधगती आग घेऊन पुजाऱ्याने ती डोक्यावरून नेण्याच्या या परंपरेला 'खापरी' असे म्हटले जाते. या धार्मिक विधीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. मंदिरापासून सुमारे शंभर मीटर अंतरावर असलेला कापूर तलाव नागपूरकर भोसल्यांनी बांधल्याचे सांगितले जाते. पूर्वी पिंगळाई गडावर जाण्यासाठी नेरपिंगळाई गावाकडूनच रस्ता होता. मात्र, यंदा गोराळा येथून मंदिरापर्यंत रुंद सिमेंट काँक्रिट रस्ता तयार झाल्याने भाविकांना देवीच्या दर्शनासाठी जाणे अधिक सोयीचे झाले आहे.

पिंगळादेवी मंदिराच्या बांधकामासह सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. यंदा मंदिराच्या गाभाऱ्यातील मुख्य मुखवट्यावर एक, देवीच्या हवनस्थळासमोर एक आणि मंदिराच्या मुख्य चार दरवाजांवर प्रत्येकी एक, असे एकूण सहा भव्य कळस उभारण्यात येत आहेत. या कळसांची निर्मिती व सजावटीचे काम राजस्थान येथे सुरू असून त्यासाठी सुमारे एक कोटी ४० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या धार्मिक कार्यासाठी भाविकांनी सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

देणगी देण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी संस्थानच्या वतीने क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविकांना संस्थानच्या बँक खात्यात थेट देणगी जमा करता येणार आहे. या कार्यात सहकार्य करणाऱ्या दानशूर भाविकांचा सत्कार करून त्यांचा नामोल्लेख करण्याचा मानस विश्वस्त मंडळाने व्यक्त केला आहे

**भाविकांसाठी सुविधा; पोलिसांचा चोख बंदोबस्त**

पिंगळाई गड परिसर हिरवाईने नटलेला असून येथे सार्वजनिक मंगल कार्यालय व सांस्कृतिक भवनाची व्यवस्था आहे. याच परिसरात अप्पर वर्धा धरणाच्या पाण्याची मोठी टाकी आणि जलशुद्धीकरण केंद्र असून येथून अमरावती शहराला पाणीपुरवठा केला जातो. पिंगळाई गडाला परिसरातील पर्यटनस्थळ म्हणूनही महत्त्व प्राप्त झाले आहे. नवरात्रोत्सवात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन विश्वस्त मंडळाने विविध सुविधा व व्यवस्था केल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील आणि शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार ईश्वर वर्गे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पिंगळादेवीच्या दर्शनाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन पिंगळादेवी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विनीत पाखोडे, सचिव आशिष मारुडकर, विश्वस्त पद्माकरराव पाखोडे आणि मंदिराचे मुख्य पुजारी संदीप मारुडकर यांनी केले आहे.

---

# अहिल्यानगर येथे एफडीएची धडक कारवाई! प्रसिद्ध बेकरीचा परवाना निलंबित

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**चिकलठाणा** – अन्न आणि औषध प्रशासनाने छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी येथील 'रॉयल बेकर्स अँड कन्फेक्शनर्स' या बेकरीवर कठोर कारवाई करत तिचा अन्न परवाना तात्काळ निलंबित केला आहे. एका सजग ग्राहकाने विकत घेतलेल्या कप केकमध्ये प्लास्टिक आणि रबरचे तुकडे आढळल्याची तक्रार एफडीएकडे केली होती. या गंभीर घटनेची दखल घेत प्रशासनाने ही धडक कारवाई केली. तक्रारीचे गांभीर्य ओळखून अन्न सुरक्षा अधिकारी पी. एस. अजिंठेकर यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित बेकरीच्या उत्पादन युनिटला अचानक भेट देऊन पाहणी केली. या तपासणीत बेकरीमध्ये अन्न सुरक्षेच्या आणि स्वच्छतेच्या नियमांची पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट झाले. पाहणी दरम्यान उघडकीस आलेल्या मुख्य त्रुटी तपासणी अहवालानुसार बेकरीच्या आवारात अनेक गंभीर आणि धोकादायक त्रुटी आढळून आल्या.

---

# शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई रकमेत दोनपट वाढ करा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## तालुक्यातील शेतकऱ्यांची विभागीय आयुक्तांकडे मागणी

**वरुड** – राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईच्या रकमेत दोनपट वाढ करण्यात यावी, अशी मागणी विभागीय आयुक्तांसह जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांकडे केली आहे.



या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, शेतकरी सध्या अत्यंत गंभीर आर्थिक संकटातून जात आहे. कमी पाऊस, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, गारपीट तसेच इतर नैसर्गिक आपत्तीमुळे खरीप व रब्बी पिकांसह संत्रा व मोसंबी आंबिया बहार व मृग बहार फळिपकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.एकीकडे उत्पादनात मोठी घट होत असताना दुसरीकडे शेतीचा खर्च सातत्याने वाढत आहे. खते, फवारणी औषधे, मजुरी, मशागत, सिंचन व इतर निविष्ठांच्या वाढत्या दरामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याची राज्य आपत्ती प्रतिसाद निधी नुकसान भरपाई ही प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या तुलनेत अत्यंत अपुरी ठरत आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या गंभीर अडचणी लक्षात घेऊन राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत नुकसान भरपाईच्या रकमेत तातडीने वाढ करुन वाढीव मदत मंजुर करावी, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने अंकुश बोडनासे ,चंद्रकांत बोडनासे, अजय गाडगे, सुनील गावंडे आदींनी केली आहे.

---

# माण, खटाव, फलटण, खंडाळ्यात भीषण स्थिती

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**कराड** – 'एल-निनो'च्या प्रभावी अडथळ्यामुळे यावर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावरतीच पावसाने हात आखडता घेतल्याने यंदा अनेक देश भीषण दुष्काळाच्या खाईत लोटले गेले आहेत. त्यातच, आपल्या देशातही 'एल-निनो'च्या प्रभावामुळे प्रतिवर्षी कोसळणारा नैऋत्य मोसमी पाऊस यावर्षी सरासरीपेक्षा कमी प्रमाणात पडल्याने पाणीसाठ्यांसह जमिनीतील जलपातळीवरही गंभीर परिणाम झाला आहे. यावर्षीचा नैऋत्य मोसमी पाऊस आता परत फिरल्याने पावसाच्या उरल्या-सुरल्या आशाही मावळल्या आहेत. यंदाच्या जून ते सप्टेंबर या मान्सूनच्या कालावधीत सरासरीच्या ५० टक्के पेक्षा कमी पाऊस पडला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात केवळ शेतीचेच नव्हे तर पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्यही मोठ्या प्रमाणात जाणवणार असून भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागणार आहे त्यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्यासह शेत पिकांना अत्यावश्यक असणारा पाणी पुरवठा व जनावरांच्या चाऱ्यासाठीची उपाययोजना आतापासूनच करण्यात यावी अशी मागणी दुष्काळग्रस्त तालुक्यांतून होत आहे.

---

**वरुड : जायंटस गृप ऑफ वरुडचे माजी अध्यक्ष तथा न.प.स्विकृत सदस्य संजय उर्फ योगेश्वर खासबागे यांचा वाढदिवस आज शहरातील विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.**



पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना राजु भडके, नगरसेवक तारेश देशमुख, स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस, दत्ता शिंदे, सेवानिवृत्त शिक्षक दिलीप टाकरखेडे.



पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना माजी तहसिलदार कमलाकर देशमुख, संतोष निमगरे, माजी नगरसेवक राजु सुपले, नरेश टाकरखेडे, राजेश शहाणे, प्रकाश पाचघरे, सदानंद साबळे, प्रकाश देशमुख, बच्चु आंडे व इतर



पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना प्रा.अश्वपाल वानखडे, माजी प्राचार्य रमेशराव झोटिंग, अमोल कुक्कडे, गोपाल चिमोटे, प्रमोद रडके, अतुल काळे व राजु भडके.

---

## जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत हरीसेवा फाऊंडेशनच्या सौजन्याने

# वन्यजीव सप्ताह निमित्ताने 'निबंध स्पर्धा' उत्साहात

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा करजगाव (गांधीघर) येथे हरीसेवा फाऊंडेशन वरूड यांच्या सौजन्याने 'वन्यजीव सप्ताह' आणि त्यानिमित्ताने 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान 'वन्यजीव सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वन्यप्राण्यांचे रक्षण, जंगलांचे संवर्धन आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड व जाणीव निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.





विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशील विचार रुजावेत म्हणुन 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेसाठी पहिली ते चौथी करीता गट अ करीता 'माझा आवडता वन्यप्राणी' व 'जंगल आणि आपण', पाचवी ते सातवी करीता गट ब 'पर्यावरण संतुलन आणि वन्यजीव संरक्षण' व 'जर जंगल नष्ट झाले तर...?' हे विषय ठेवण्यात आले आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या स्पर्धेत सहभाग घेतला व आपले विचार निबंधातून मांडले. निबंध स्पर्धेत उत्कृष्ट लेखन करणाऱ्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक व निसर्गाशी संबंधित पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राण्यांशिवाय जंगल आणि जंगलांशिवाय माणसाचे अस्तित्व अशक्य आहे हे प्रा.संजय सातपुते यांनी स्पष्ट केले. केवळ पुस्तकी ज्ञान न ठेवता झाडे लावणे आणि वन्यप्राण्यांच्या अधिवासाला इजा न पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, असा संकल्प घेण्याचा आग्रह विवेक बुरे यांनी केला.

टाकाऊ पदार्थ आणि इतर साहित्यापासून पक्षांकरिता घरटे कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक रामभाऊ राऊत यांनी दाखविले. पुढील पिढीचे नागरिक आणि पर्यावरण सैनिक म्हणुन विद्यार्थ्यांना रास्त भुमिका पार पाडण्याचे आवाहन हरी-सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे यांनी केले. याप्रसंगी हरीसेवा फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष उमेश कांडलकर सुध्दा उपस्थित होते.

यावेळी हरीसेवा फाऊंडेशन तर्फे महेश बोरकुटे यांनी विद्यार्थांना शेंगदाणे, गुळाची चिक्की वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा करजगाव (गांधीघर) येथील मुख्याध्यापक प्रमोद जावळे, सहायक शिक्षक गोपाल गुल्हाने, राजेंद्र बहुरुपी, सुरेखा पोकळे, संगिता बरवड उपस्थित होते.

# नवरात्रीत 'जिहादी' दिसले तर खबरदार! मंत्री नितेश राणे यांचा इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – नवरात्रोत्सवातील गरबा आणि दांडियाच्या कार्यक्रमांत खोटी ओळख सांगून प्रवेश करण्याचा किंवा हिंदू महिलांची छेड काढण्याचा प्रयत्न केल्यास खबरदार, असा इशारा मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी शनिवारी दिला. मुंबईतील सुवर्णगड या शासकीय निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मंत्री राणे म्हणाले, नवरात्रोत्सव हा हिंदूंचा सण असून गरबा आणि दांडियाला सनातन हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. या उत्सवात सहभागी होण्यासाठी कोणी नाव किंवा ओळख बदलून प्रवेश करण्याचा आणि त्यातून 'लव्ह जिहाद'चा प्रयत्न केल्यास तो सहन केला जाणार नाही. अशा प्रकारे कोणी महिलांकडे वाईट नजरेने पाहिल्यास आमच्या पोलिसांचे दांड त्यांच्याशी दांडिया खेळतील. मग शुक्रवारी बाहेर पडणेही अवघड होऊन बसेल. दांडिया खेळण्यासाठी येऊ इच्छिणाऱ्यांनी आपला मूळ धर्म स्वीकारावा, मूर्तिपूजा करावी, देवीची आरती किंवा हनुमान चालीसा म्हणावी आणि मग उत्सवात सहभागी व्हावे.

# धरणातील गाळ काढण्याची गरज... प्रशासनाने दिलेला अभिप्राय स्थायी समितीने परत पाठवला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील गाळ काढून त्यातील पाणलोट क्षेत्र वाढवणे हे आवश्यक आहे.

मात्र, या धरणांमधील गाळ हा वर्षाला केवळ ०.२ पेक्षाही कमी असल्याचे उत्तर घाईघाईत प्रशासनाच्यावतीने देण्यात आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात पाण्याचे बुडीत क्षेत्र वाढवून काही त्यातील पाणी साठा वाढवणे आवश्यक आहे. त्यामुळे धरणांमधील गाळ काढण्याची आज गरज असून प्रशासनाकडून याबाबत सकारात्मक पाऊल उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाकडून योग्य उत्तर न आल्याने आयुक्तांकडून देण्यात आलेला अभिप्राय परत फेरविचारासाठी स्थायी समितीने पाठवला आहे. केंद्रीय जल आयोग (सीडब्ल्यूसी) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) यांची नियुक्ती महानगरपालिकेच्या तलावातील गाळ सर्वेक्षणासाठी केली होती. यासंस्थे मार्फत विहार तलावाचे गाळ सर्वेक्षण सुदूर संवेदन तंत्राने आणि तुळशी धरणाचे गाळ सर्वेक्षण पूर्ण करण्यात येऊन गाळ सर्वेक्षणाअंती मे २०२४ मध्ये पाणी साठवण क्षमतेत अनुक्रमे १६.४२ टक्के व १४.९८ टक्के घट निर्दशनास आली आहे.

# केंद्रीय पथक शेतकऱ्यांच्या बांधावर! यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी

**दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या**

**कापूस, सोयाबीन, तूर पिकांची प्रत्यक्ष पाहणी व मूल्यांकन**

**दुष्काळी संकटाशी दोन हात करण्यासाठी शेतकऱ्यांना दिला धीर**

**शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक**

**पीक परिस्थितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर करणार**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**यवतमाळ** – यंदाच्या खरीप हंगामात पावसातील खंड आणि पिके करपल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकाने आज यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला. पथकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची प्रत्यक्ष पाहणी व मूल्यांकन केले. तसेच दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा, अडचणी आणि मागण्या जाणून घेत त्यांना संकटाशी दोन हात करण्यासाठी धीर दिला. यंदाच्या खरीप हंगामात पावसाचा खंड पडल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाचा ट्रिगर-१ लागू केला आहे. बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनासोबतच केंद्र सरकारकडूनही मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन मदतीची मागणी केली होती. त्यानंतर दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी व नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्रीय पथक जिल्ह्यात दाखल झाले. या पथकात केंद्रीय जलसंपदा विभागाच्या संनियंत्रण संचालनालयाचे संचालक तथा पथकप्रमुख अर्जेश कुमार मधोक, वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाचे सहसंचालक महेश कुमार, कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या अवर सचिव सीमा राणी आणि ग्रामीण विकास विभागाचे अवर सचिव संजय मीना यांचा समावेश होता. पथकाने यवतमाळ तालुक्यातील मडकोना व लासिना, तसेच नेर तालुक्यातील लोणी, मांडवगड, वटफळी आणि दोडकी या गावांना भेट दिली. यावेळी शेतातील कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची पाहणी करून पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंडामुळे झालेली हानी आणि शेतीसमोरील अडचणींची माहिती घेतली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. दुष्काळी संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीच्या दृष्टीने केंद्र सरकार सकारात्मक असल्याचा विश्वासही या दौऱ्यातून व्यक्त करण्यात आला.

**श्री गौरक्षण गौशाळेची पाहणी**

केंद्रीय पथकाने यवतमाळ शहरातील श्री गौरक्षण संस्थेला भेट देऊन गौशाळेची पाहणी केली. यावेळी गायींची संख्या, उपलब्ध चारा आणि पशुधनासाठी राज्य शासनाकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. पथकातील सदस्यांनी गौशाळेतील गायींना पशुखाद्य भरवून पशुधनाप्रती आपुलकीची भावना व्यक्त केली.

**लघुसिंचन प्रकल्पाची पाहणी**

यवतमाळ तालुक्यातील किटा कापरा येथील लघुसिंचन प्रकल्पालाही पथकाने भेट दिली. प्रकल्पातील घटलेल्या पाणीपातळीची स्थिती जाणून घेतली. उपलब्ध पाणीसाठा, पाण्याचे स्रोत, भूजल पातळी तसेच सिंचन प्रकल्प आणि विहिरींची पाणीपातळी वाढविण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व लक्षात घेऊन संबंधित बाबींची माहिती संकलित करण्यात आली.

# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी अमरावती विभागातील ८१ मतदान केंद्रांना निवडणूक आयोगाची मान्यता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ अंतर्गत अमरावती विभाग मतदारसंघातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या ५ जिल्ह्याच्या क्षेत्रात एकुण ८१ मतदान केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली आहे, अशी माहिती अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी दिली.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीकरीता पाठविण्यात आलेल्या ८१ मतदान केंद्रांच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने मान्यता प्रदान केली असल्याचे उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी एका पत्राद्वारे विभागीय आयुक्त यांना काल कळिवले आहे.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील जिल्हानिहाय मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे पुढील प्रमाणे आहे. अमरावती- २५, अकोला- १३, बुलढाणा- १८, वाशिम- ७, यवतमाळ- १८ अशा एकुण ८१ मतदान केंद्रांना मान्यता मिळाली आहे. येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत अमरावती विभागातील या मतदान केंद्रांवर निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जलसंधारणाच्या कामांचे प्रभावी नियोजन करण्याबरोबर तंत्रज्ञानाधारित संनियंत्रणावर भर द्यावा**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

**जलसंधारणासाठी एकात्मिक कार्ययोजना तयार करा**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

**पहिला पाऊस पडताच जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत**

जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

**जलसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढवणे आवश्यक – अभिनेते आमिर खान**

आगामी उन्हाळ्यापासून जलसंधारणाची कामे सातत्याने राबविण्याचे गरजेचे आहे. जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येईल. यंदाचे वर्ष आव्हानात्मक असले, तरी निराशेचे रूपांतर आशेत करून जनतेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे संवर्धन यावर भर देतानाच, राज्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घराने जलसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असेही अभिनेते आमिर खान यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीस नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ए.टी.ई. चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९०४/२०२६** **ने.ता.१७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती दुर्गा वसंतराव सनेसर, वय अं.६९ वर्ष, धंदा- गृहिणी, २) रविंद्र वसंत सनेसर, वय अं.४१ वर्ष, धंदा-मजुरी, ३) सौ.आरती विलास खडसे, वय अं.३६ वर्ष, धंदा- गृहिणी, तीन्ही रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ४) सौ.पुष्पा आनंदराव ठोसर, वय अं.३९ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.सिरसपेठ, नागपूर, ५) सौ.कवीता संतोष ठोसर, वय अं.३४ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.सिरसपेठ, नागपूर, ता.वरुड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** श्रीमती अर्चना राजु सनेसर, वय अं.५५ वर्ष धंदा-गृहिणी, रा.सी.एन.जी.पेट्रोल पंपजवळ, मुलताई

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत जंगलु अमृत सनेसर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०९/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

स्वच्छता ही केवळ नगरपरिषद किंवा सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून

# कचरा व्यवस्थापनात नागरिकांची जबाबदारी महत्त्वाची : स्वच्छतेसाठी जनसहभाग आवश्यक!



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील स्वच्छता ही केवळ नगरपरिषद किंवा सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, घरातील कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करणे आणि कचरा संकलन वाहनाकडेच कचरा देणे, यामुळे शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यास मोठी मदत होऊ शकते.

शहरातील रस्ते, चौक, नाल्या, बाजारपेठ तसेच सार्वजनिक ठिकाणी काही नागरिकांकडून निष्काळजीपणे कचरा टाकला जात असल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः प्लास्टिकच्या पिशव्या, खाद्यपदार्थांचे पॅकेट, बाटल्या तसेच घरगुती कचरा रस्त्याच्या कडेला टाकल्यामुळे परिसराचे विद्रूपीकरण होत असून दुर्गंधी आणि अस्वच्छता वाढत आहे.

घरातून निघणारा ओला आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवून तो कचरा संकलन व्यवस्थेकडे देणे आवश्यक आहे. ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करता येते तर सुका कचरा पुनर्वापरासाठी पाठवता येतो. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होण्याबरोबरच पर्यावरणाचेही संरक्षण होऊ शकते.

रस्त्यावर किंवा नाल्यांमध्ये कचरा टाकल्यामुळे पावसाळ्यात नाल्या तुंबण्याची शक्यता वाढते. परिणामी सांडपाणी रस्त्यावर येऊन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कचऱ्यामुळे डास, माशा व अन्य किटकांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने विविध आजारांना निमंत्रण मिळू शकते.

नगरपरिषदेकडून नियमित स्वच्छता केली जात असली तरी नागरिकांनी सहकार्य केल्याशिवाय स्वच्छ शहराचे उद्दिष्ट पूर्ण होणे शक्य नाही. प्रत्येकाने 'माझा कचरा, माझी जबाबदारी' ही भावना मनात ठेवून घर, परिसर आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. स्वच्छता ही एक दिवसाची मोहीम नसून ती रोजच्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनासोबत नागरिकांनीही जबाबदारी स्वीकारली, तर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहराची निर्मिती निश्चितपणे शक्य आहे.

शहरातील रस्त्यांवरून वाहन चालविताना किंवा प्रवास करताना काही नागरिकांकडून चॉकलेटचे रॅपर, केळीची साल, खाद्यपदार्थांचे पॅकेट तसेच इतर कचरा रस्त्यावर फेकण्याचे प्रकार सर्रास दिसून येतात. क्षणिक सोयीसाठी केलेली ही कृती शहराच्या स्वच्छतेला बाधा आणणारी असून सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ करण्यास कारणीभूत ठरत आहे.

विशेषतः दुचाकी, चारचाकी किंवा इतर वाहनातून प्रवास करताना खाद्यपदार्थ खाल्ल्यानंतर त्याचे रॅपर अथवा उरलेला कचरा रस्त्यावर फेकला जातो. काही ठिकाणी केळीची साल किंवा इतर ओला कचरा रस्त्यावर टाकला जात असल्याने वाहनचालकांसाठीही धोका निर्माण होऊ शकतो. रस्त्यावर पडलेली साल किंवा कचरा यामुळे घसरण्याची शक्यता असून अपघाताला निमंत्रण मिळू शकते.

कचरा टाकण्यासाठी काही सेकंद पुरेसे वाहनातून कचरा बाहेर फेकण्याऐवजी तो काही वेळ वाहनातच ठेवून जवळच्या कचरापेटीत टाकणे किंवा घरी नेऊन योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे सहज शक्य आहे. यासाठी मोठ्या प्रयत्नांची गरज नसून केवळ नागरिकांची इच्छाशक्ती आणि जबाबदारीची भावना आवश्यक आहे.

शहराच्या सौंदर्यावर परिणाम रस्त्याच्या कडेला पडलेले चॉकलेटचे रॅपर, प्लास्टिक, कागद, बाटल्या आणि खाद्यपदार्थांचा कचरा यामुळे शहराचे सौंदर्य खराब होते. स्वच्छतेसाठी प्रशासनाकडून प्रयत्न केले जात असताना नागरिकांनीच रस्त्यावर कचरा टाकला तर केलेले प्रयत्न निष्फळ ठरतात. त्यामुळे स्वच्छता राखण्याची जबाबदारी केवळ सफाई कर्मचाऱ्यांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे.

'कचरा माझा, जबाबदारीही माझी'लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाने कचरा रस्त्यावर न टाकण्याची सवय लावणे गरजेचे आहे. विशेषतः पालकांनी मुलांना चॉकलेट, बिस्कीट किंवा इतर खाद्यपदार्थांचे रॅपर रस्त्यावर न टाकता ते कचरापेटीत टाकण्याची सवय लावावी. वाहनचालकांनीही प्रवासादरम्यान कचऱ्यासाठी वाहनात छोटी पिशवी ठेवणे हा सोपा उपाय ठरु शकतो.

स्वच्छ रस्ता, सुंदर शहर आणि निरोगी समाजासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांच्या सहकार्याची जोड आवश्यक आहे. 'वाहनातून काहीही बाहेर फेकणार नाही' असा संकल्प प्रत्येकाने केला तर शहरातील अस्वच्छतेवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल.



"शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी व्यापारी बांधवांनी पुढाकार घ्यावा, बाजारपेठेतील स्वच्छता राखण्यात व्यापाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असून प्रत्येकाने आपल्या दुकानासमोरील परिसर स्वच्छ ठेवण्याची काळजी घ्यावी, दुकानांमधून निघणारा कचरा रस्त्यावर टाकल्याने बाजारपेठेत अस्वच्छता निर्माण होते. त्यामुळे व्यापाऱ्यांनी कचरा घंटागाडीत द्यावा, प्लास्टिक व इतर कचरा उघड्यावर टाकू नये तसेच ग्राहकांनाही स्वच्छतेबाबत जागरुक करावे. दुकानासमोर कचरा साचणार नाही, याची प्रत्येक व्यापाऱ्याने दक्षता घेतल्यास बाजारपेठेचे चित्र बदलण्यास मदत होईल. स्वच्छ बाजारपेठ ही शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्यासाठीही महत्त्वाची आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या प्रयत्नांना व्यापारी बांधवांची साथ मिळाल्यास शहर स्वच्छ ठेवणे अधिक सोपे होईल. त्यामुळे व्यापाऱ्यांनी आपल्या व्यवसायासोबतच परिसराच्या स्वच्छतेलाही प्राधान्य द्यावे आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष रितेश शाह यांनी केले.



"शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, शहरातील स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे असून, प्रत्येकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे, रस्त्यावर, नाल्यांमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याने अस्वच्छता वाढते. त्यामुळे नागरिकांनी कचरा उघड्यावर न टाकता घंटागाडीत द्यावा. ओला आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवावा, तसेच प्लास्टिकचा वापर टाळून परिसर स्वच्छ ठेवण्यास हातभार लावावा.

शहरातील स्वच्छता टिकवून ठेवण्यासाठी नगरपालिकेकडून प्रयत्न केले जात असले, तरी नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. स्वच्छतेबाबत प्रत्येकाने जागरुक राहिल्यास शहरातील अस्वच्छतेची समस्या कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे नागरिकांनी स्वच्छतेचे नियम पाळून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी केले.



"शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, नागरिकांनी रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, ओला व सुका कचरा वेगवेगळा जमा करावा तसेच नाल्यांमध्ये प्लास्टिक टाकणे टाळावे, शहराची स्वच्छता राखणे ही प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नागरिकांनी स्वच्छतेच्या नियमांचे पालन करुन शहराच्या सौंदर्य आणि आरोग्यपूर्ण वातावरण निर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहन नगरसेवक गोपी अढाऊ यांनी केले आहे.



"नगरपरिषदेच्या वतीने संपुर्ण शहरात स्वच्छता ठेवण्यास प्राधान्य दिले जात आहे, नगरपरिषदेला आतापर्यंत स्वच्छतेच्या संदर्भात अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहे, पुढेही अनेक पुरस्कार प्राप्त करावयचे आहेत, त्यामुळे शहराच्या स्वच्छतेसाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, ज्या पध्दतीने आपले घर आपण स्वच्छ ठेवतो त्याच पध्दतीने आपले शहर स्वच्छ कसे राहील, याकरीता प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन न.प.आरोग्य समिती सभापती विनय खासबागे यांनी केले आहे.

महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केल्याप्रकरणी

## वाठोडा येथील ईसमाविरुध्द विनयभंगाचा गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – ग्रामीण रुग्णालयात महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केल्याप्रकरणी वरुड पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरुन वाठोडा चांदस येथील सुनिल खाडे विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार, फिर्यादी महिला ही ग्रामीण रुग्णालय वरुड येथे कार्यरत असून रुग्णाचे औषधी लिहून देण्याकरीता रुग्णालयातील आत्पकालीन




विभागात बसलेली असतांना आरोपी सुनिल खाडे आला आणि महिलेला 'रक्तदाब चेक करायचा आहे', असे म्हटले. त्यावर फिर्यादीने त्याला म्हटले की, 'तुम्ही सायंकाळी ५ ते ६' या दरम्यान बाहयरुग्ण विभागात या तर आरोपी हा आत्पकालीन विभागाच्या कक्षासमोर सभा राहुन फिर्यादी महिलेकडे बघून अश्लिल ईशारे करु लागला. फिर्यादी महिलेने त्याला हटकले असता आरोपी तेथुन पळुन गेला.

या प्रकरणी ४६ वर्षीय महिलेल्या फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी सुनिल हरिभाऊ खाडे रा.वाठोडा यांचेविरुध्द कलम ७४, ७५ बी.एन.एस.२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

## खोटं बोलत असल्याचा संताप : इंजिनियर मुलाने जन्मदात्या आईचाच बळी घेतला

### मृतदेहजवळच बसून राहिला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – अमरावती शहरातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात इंजिनियर असलेल्या मुलानेच जन्मदात्या आईची हत्या केल्याची घटना घडलीय. आई खोटं बोलत असल्याच्या कारणावरून संतापलेल्या मुलाने ही हत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. तर




हत्येनंतर आरोपी मुलगा घटनास्थळीच बसून असल्याचेही पुढे आले आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून या घटनेचा अधिक तपास सध्या गाडगे नगर पोलिसांकडून सुरू आहे. पुण्यातील नामांकित कंपनीत इंजिनिअर, आईसोबत वाद अनब संतापात बळी घेतला मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती शहरातील नवसारी रिंग रोड परिसरातील गजानन प्लाझा अपार्टमेंटमध्ये ६५ वर्षीय आईची तिच्याच मुलाने गळा आवळून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. रंजना सतीश कानफाडे असं मृत महिलेचं नाव असून, तुषार सतीश कानफाडे असं संशयित आरोपी मुलाचं नाव आहे. तर संशयित आरोपी तुषार हा पुण्यातील एका कंपनीत इंजिनिअर म्हणून नोकरी करत असल्याची माहिती समोर येत असून तों सध्या वर्क फ्रॉम होम म्हणून घरीच काम करीत होता. तर फ्लॅटमध्ये आई आणि मुलगाच राहत असल्याची माहिती आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |




